अनेकदा माद्यांमध्ये ही लक्षणे दुसऱ्या दिवशी समागमा सुद्धा दिसून येतात तेव्हा त्यांचे पुन्हा 12–14 तासांच्या अंतराने प्रजनन करणे, जेणेकरून हि प्रक्रिया आपल्या माद्यांमध्ये उच्च गर्भधारण दर सुनिश्चीत करेल.

माद्या, पिलांपासून वेगळ्या काढल्यानंतर दोन ते दहा दिवसांत प्रजननासाठी उष्णतेमध्ये येतात, ज्यांचे प्रजनन केले जाऊ शकते, परंतु उत्तम निकालासाठी एक माज सोडून त्याानतर प्रजनन करावे. प्रजननानंतर माद्यांवर लक्ष ठेवावे. जर दोन सतत मासिक पाळ्यांमध्ये यशस्वी भरवल्यानंतर सूद्धा केल्यानंतरही गर्भधारणा न झाल्यास त्याा माद्यांना कळपातून काढावे. यशस्वी गाभण झालेल्या माद्यांना जास्त अतिरीक्त अन्न देऊ नये, ज्यामुळे चरबी वाढून कमकूवत पिलांचा जन्म होऊ शकतो किंवा पिलांना जन्मावेळी चिरडले जाऊ शकते. पहिल्या वेळी पिलांना जन्म देणाऱ्या माद्यांचे वजन प्रजननावेळी ते पिलांना जन्म देई पर्यंत 35 किलो  तर अन्य माद्यामध्ये 55 किलोपर्यंत वाढले पाहिजे.



## गरोदर माद्यांचे व्यवस्थापन व काळजी

सरासरी गर्भधारणा  कालावधी 114  –120 दिवसांचा असतो. एकमेकांशी लढून गर्भपात वैगरे होऊ नये म्हणून गरोदर प्राण्यांना वेगवेगळे ठेवावे. गरोदर माद्यांना पुरेसे पौष्टिक अन्न द्यावे. माद्यांना प्रसूतीगहात आणण्यापूर्वी ती खोली निर्जंतुक करून घ्यावी व सदैव स्वच्छ ठेवावी. गरोदर माद्यांना  दोन आठवड्यांअगोदर प्रसूतिगृहात आणावे, जेणेकरून त्याांना त्याांच्या सभोवतालची सवय होईल.  तांदूळ किंवा गव्हाचा कोंडा  द्यावा. संरक्षक कठडयाची आणि पळण्याची  जागेची तरतूद प्रसूती – गृहामध्ये करावी. प्रसुतीग्रहातील खोल्यांचे  तापमान 30 डिग्री सेल्सीअस ठेवावे, तसेच हिवाळ्यात अन् पावसाळ्यात उष्णता देणारे वीजेचे दिवे लावून नवजात पिलांचे रक्षण करावे.

## अनाथ पिलांचे संगोपन

प्रसूतीवेळी किवा प्रसूतीनंतर माघा मरण पावणे, मादीला कमी दुध येणे, अशा  कारणांमुळे पिले अनाथ होतात. अशा पिलांना त्याांच्या बरोबर पिले दिलेल्या अन्य माद्यांजवळ ठेवावे. दुसऱ्या पिलांचा स्वीकार करण्यासाठी, मादीपासून तीच्या पिलांना वेगळे करून अनाथ पिलांना तीच्या पिलांमध्ये मिसळून व वेगवेगळा  वास टाळण्यासाठी सर्वांना टिनचर आयोडीन / बेनझोईन सारखा प्रखर वास असलेला पदार्थ लावून परत द्यावे. अनाथ पिलांना दुधाअभावी बदली दुधाने वाढवता येते, जे एका अंड्याचा पिवळा बलक एक लिटर गाईच्या दुधात मिसळून बनवण्यात येते.

## दूध सोडणे

पिलांना आईपासून 6 ते 8 आठवड्यांच्या कालावधीत वेगळे करावे. मादेला पिलांपासून वेगळे करण्याचा त्रास होऊ नये म्हणून तत्पूर्वी दररोज काही तासांसाठी तीला पिलांपासून वेगळे करावे तसेच आहार सुद्धा हळूहळू कमी करावा.

पिलांना दुधापासून वेगळे केल्यावर दोन आठवड्यांनी जंतनाशक औषध पाजवावे. पिलांना दोन आठवड्यांच्या कालावधीत हळूहळू 18% प्रोटीन आहारापासून 16% ग्रोवर आहारावर हलवावे. प्रत्योक कप्यामध्ये समान वयाच्या 20 पिलांचा समूह ठेवावा.

## आरोग्य व्यवस्थापन

इतर पशुधनांप्रमाणे डुकरांनाही जिवाणू संसर्ग, विषाणूजन्य संसर्ग आणि परिजीवी संसर्गांमुळे आजार होतात. अनेकवेळा पर्यावरणातील बदलांमुळे त्रास, चुकिच्या अन्नप्राशनामुळे, वा आहारातील बदलांमुळे डुकरांना आजार होऊ शकतात. लसिकरण – सर्व नवजात पिलांना 2 महिने वयाच्या वेळी कीमान स्वाईन तापाविरुद्ध (स्वाईन फ्लू) लसीकरण करणे गरजेचे आहे. तसेच डुकरांमध्ये, पाश्चरेलेसीस (हेमोरेजिक सेप्टिसिमिया/एच एस) आणि गुरांसारख्या तोंडांची  आणि पायांच्या (फुट एण्ड माउथ) लागण होणाऱ्या  आजारावरील लसिकरणांस प्राधान्य दिले जाते.

जंतनाशन, जंतांच्या संसर्गामुळे, पिलांमध्ये अतिसार होतो. तसेच वजन घटणे, फुफ्फुसाचा त्रास होणे, अथवा मृत्यू येऊ शकतो. त्याामुळे नियमितपणे दर तीन महिन्यांतून एकदातरी जंतूनाशन करावे.

## पिलांमधिल ॲनिमिया

माद्या, वेगाने वाढणाऱ्या पिलांना दुधातून आवश्यक लोहाची पूरवणूक करू शकत नाही. जे पिल्ले सिमेट कॉकिट ने लेप दिलेल्या जमीनीवर वाढतात सामान्यतः त्याांमध्ये ॲनिमियाचा त्रास जास्त उदभवतो. पिलांमधिल लोहाची कमतरता टाळण्यासाठी त्याांना लोह डेक्सट्रोनचे इंजेक्शन द्यावे किंवा आईच्या स्तनांवर फेर्रस सल्फेटचा लेप लावावा, जेणेकरून पिले दुध पिताना त्याना त्याातून लोह खनिज मिळते. त्वचा रोग, त्वचा संसर्ग हे समान्यतः उदभवणारे आजार असतात, जे अनेक जीवाणू, उवा, टिक्स, माइटस आणि बुरशी या सारख्या किटकांमूळे होऊ शकतात. त्याामुळे त्वचा घट्ट होते आणि क्रस्टिंग होते. जर उपचार न झाल्यास खरूज होऊ शकते ही खरूज डोक्याभवती, कानांवर, पायांवर, शेपूटावर पसरू शकते. उवा त्वचा खाऊन डुकराला त्रास देतात, ज्यामुळे खाज येते, खाजवल्याने त्याांना जखम होण्याची संभावना असते, तिथे संसर्ग होण्याचा धोका असतो. परोपजीवी प्रादुर्भावावर मात करण्यासाठी जनावरांवर औषधाची फवारणी करावी अथवा त्याना अशा द्रव्यात बुडवून काढावे तसेच त्यांच्या पेनमध्येसुद्धा फवारणी करावी.

## डुक्करपालनातून उत्कृष्ट दर्जाचे मांस उत्पादन करून नफा कसा वाढवणे?

उत्कृष्ट दर्जाचे डुक्कर उत्पादन करून नफा वाढवणे म्हणजेच वेगाने वाढणारे आणि जास्त वजन गाठणारे डुक्कर उत्पादन करणे. ज्यामध्ये उत्पादन खर्च कमी येतो, कमी आहार द्यावा लागतो, आणि कमी वेळेत डुकरांची वाढ होते. रोगप्रतिकार शक्ती उत्तम असलेला डुक्कर औषधांवरिल कमी खर्चामुळे फायदेशीर ठरतो.

## उत्पादनांची विक्री

जिवंत डुकरापेक्षा कत्तल करून मांस विकल्यास शेतकऱ्याला जास्त नफा मिळतो. जर मांसापासून वेगवेगळी उत्पादने करून विक्री केल्यास नफा अनेक पटीने वाढवता येतो. उदाहरणात सोसेजीस.


**द्वारे तयार:**

**डॉ. अमिया रंजन साहू**
(शास्त्रज्ञ, प्राणी अनुवंशशास्त्र आणि प्रजनन)

**डॉ. शिरीष नारनवरे**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ, पशुवैद्यकीय विकृति विज्ञान)

**श्री. विठ्ठल जगन्नाथ नाईक**
(यंग प्रोफेशनल–I)

**श्री. किरण हंगरगी**
(यंग प्रोफेशनल–I)

**याद्वारे सचिवीय सहाय्य:**
श्री. सिधार्थ मराठे
सहाय्यक मुख्य तांत्रिक अधिकारी
पीएमई सेल



**द्वारे प्रकाशित:**

**डॉ. परवीन कुमार**
दिग्दर्शक
भा.कृ.अनु.प. – सेंट्रल कोस्टल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट
एला, ओल्ड गोवा – 403402, दूरध्वनी: 0832–2995095
ईमेल: director.ccari@icar.gov.in
वेबसाइट: https:www.ccari.icar.gov.in



Extension Folder No. 119/2024






# वैज्ञानिक डुक्कर पालन





भा.कृ.अनु.प.–केंद्रीय तटीय कृषि अनुसंधान संस्थान
एला, ओल्ड गोवा 403402 गोवा (भारत)
(आई.एस.ओ. प्रमाणित संगठन)

# वैज्ञानिक डुक्कर पालन

डुक्कर हा प्राणी वेग-वेगळ्या निकृष्ट दर्जाचे अन्न पचवून त्यांचे पौष्टिक मांसात रूपांतरीत करतात. उत्कृष्ट प्रजनन क्षमता असलेली मादी डुक्कर 10 ते 12 पिलांना एका वेळी जन्म देऊ शकते, ज्यांची वाढ झपाट्याने तसेच कमीत कमी खर्चात होते. कमी भांडवलात, साधारण बांधकामातून उभारलेल्या, योग्य खाद्य देऊन व साधारण रोग नियंत्रणा द्वारे डुक्कर पालन शेतकऱ्याला भरभराट उत्पन्न देऊ शकतात. डुक्कर पालना द्वारे लहान शेतकरी किंवा नोकरी करणारे सुद्धा अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात.

## डुकरांच्या प्रजाती

कोणत्या डुकरांच्या जाती उत्तम उत्पन्नासाठी वापराव्यात हा एक प्रमुख घटक आहे. निवडलेली प्रजाती करिता त्या परिसरात, वातावरणात पोषक वातावरण असणे गरजेचे आहे. डुकरांची शारीरीक वाढ वेगात व रोगप्रतिकार शक्ती चांगली, असणे गरजेची असते.

### 1. आगोंदा गोवन

उत्तम वातावरण अनुकूल समाविष्टता, किमान अन्न पुरवठ्यामध्ये जगणारी - लवकर पूर्णावस्था गाठणारी आणि चांगले मातृत्व असणारी ही एक स्थानिक डुकरांची प्रजाती आहे. हया डुकरांना पाळणे थोडे अवघड असते, त्यांच्या रानटी स्वभावामुळे हे विदेशी प्रजातीशी संकरीत करण्यास उत्तम मानल्या जाते जेणेकरून ह्याच्यामधे उत्कृष्ट वातावरण अनुकुलता, रोगप्रतिकारक क्षमता व पोषकता येते.



### 2. पांढरा यॉर्कशायर

ही प्रजाती गोव्याच्या वातावरणास पोषक आहे व चांगल्या रीतीने सांभाळ केल्यास यांची वाढ उत्तम होते. याला पाठीला जास्त चरबी असते. हे डुक्कर गोव्यातील स्थानिक डुक्करांसोबत संकरित करण्यास, प्रजनन करण्यास वापरले जाऊ शकतात.



### 3. संकरित डुक्कर (गोवा स्थानीक x पांढरा योर्कशायर)

हे संकरित डुक्कर, गोव्यातिल स्थानिक मादींचे प्रजनन मोठ्या योर्कशायर नर डुक्कर, वापरून तयार केले आहे. हे संकरित डुक्कर गोव्यातील वातावरणास अनुकूल आहेत. हे चांगली शारीरीक वाढ आणि अन्नातून मांस उत्पादन करण्यास सक्षम आहेत. ह्या डुकरांना शुद्ध डुक्कर योर्कशायर सारखी काळजी घेण्याची गरज नसते.



## संकरित डुकरांची वाढ क्षमता / कामगीरी

| | |
|---|---|
| जन्मावेळी सरासरी वजन | 600 ग्रॅम ते 700 ग्रॅम |
| आईच्या दुधापासुन काढतानाचे वजन | 7 ते 8 किलो |
| यौवनात येण्याचे सरासरी वय | 190 दिवस |
| लैंगिक परिपक्वतेचे सरासरी वय | 220 दिवस |
| पहिल्या पिलांना जन्म देण्याचे वय | 335 दिवस |
| वयाच्या 10 महिन्यांत वजन | 85 -90 किलो |
| मांसाची टक्केवारी | 87.01% |
| पाठीवरील चरबीची जाडी | 3.36 सेंमी |





## डुकरांसाठी निवासस्थान

डुकरांचे घर साधे व टिकाऊ असावे. जमीन थोडी खडबडीत सिमेंटयुक्त अणि जलरोधक असावी पाण्याच्या निचरेसाठी खाया असाव्यात. साधारणत गावातील परिस्थीतीनुसार 3 मीटर x 2.4 मीटर आकाराचे राहण्याचा गोठा व सभोवताली मुक्त अंगण असावे किंवा याहून किंचीत लाब भींती 1.2 ते 1.5 मीटर ऊंच असाव्यात. पिलांच्या जन्मासाठी मादींना आवश्यक बदल असलेल्या कप्प्यामध्ये ठेवावे. अश्या कप्प्यामध्ये लहान पिल्ले त्याच्यां आईकडून गूदमरून मरु नये साठी तिन्हीबाजूने जमीनीपासून 20 ते 25 से. मी अंतरावर 5 से. मी व्यासाचे जी आई पाईप लावून ध्यावे जेणेकरून पिल्ले सूरक्षित राहतील व पिल्लाना वेगली जागा मिळेल. ते विभाजन पिलांना स्वतंत्र पळण्यास व कोपऱ्यांत सुरक्षित सहण्यास मददगार ठरेल. सहसा हे क्षेत्रफळ साधारणात 0.75 मीटर ✲ 2.8 मीटर असावे.

## डुकरांसाठी आहार

डुक्कर पालनातील यश हे वैज्ञानिक पद्धतींतून देण्यात येणाऱ्या आहारावर अवलंबून आहे. भारतात साधारणतः डुकराना 70 किलो वजन गाठल्यावर कत्तल करण्यास येते, हे वजन ते सहा महिन्यांत गाठतात, तीव्र मांसोत्पादन करण्यासाठी उच्च दर्जाचा डुकराना संतुलित आहार देणे आवश्यक आहे. बाजारातील गरजेचे वजन भरण्यापूर्वी डुकरांना तीन तऱ्हेचे अन्न देण्यात येते. साधारणात 15 ते 20 किलोग्राम वजनापर्यंत एका प्रकारचे (क्रिपर /स्टार्टर) जे सुरुवातीला तदनंतर, 50 किलोग्राम पर्यंत दुसऱ्या प्रकारचे (ग्रोवर) जे वाढीसाठी तर त्यापुढे 70 किलो वजन व त्याच्यावर अंतिम वाढीसाठी (फिनिशर) तीसऱ्या प्रकारचे अन्न दिले जाते. तथापि गोव्यातील बहुतांश शेतकरी, डुकरांना मोफत किंवा कमी किंमतीत मिळणारे अन्न देऊन पाळतात. ज्यात स्वयंपाकघरातीला कचरा, उरलेले अन्न, होटल मधील कचरा, बेकरीतील कचरा, भाजीपाल्याच्या मंडितील कचरा, फळभाज्या, कोंबडी कापणाऱ्यांकडून मिळणारे अभक्षणीय मांस (जसे पाये, डोके, इत्यादी) असे अन्न डुक्करांना देतात. डुक्कर उत्पादन किफायतशीर व फायदेशीर करण्यास हे, अपारंपारिक अन्न जे कमी किंमतीत उपलब्ध होते, ते देतात.

## डुक्करांच्या आहाराचे प्रकार व. 100 किलोसाठी लागणारे घटक

| साहित्या | क्रीपर/स्टार्टर फिड | उत्पादक फिड | फिनिशर फिड |
|---|---|---|---|
| मका | 50.0 | 45.0 | 40.0 |
| तांदूळ / भात भूसा | 22.5 | 35.0 | 47.5 |
| सोयाबीनचे खाद्य | 25.0 | 17.50 | 10.0 |
| खनिज मिश्रण | 02.0 | 02.0 | 02.0 |
| मीठ | 0.50 | 0.50 | 0.50 |

## डुकरांचे प्रजनन

जी मादी 80 ते 100 किलो वजनाची असते त्यांचा प्रजननासाठी वापर केला जाऊ शकतो. यौवनानंतर गर्भधारणासाठी दुसऱ्या किंवा तिसऱ्या मासिक पाळीला थांबल्याने जास्त बीज जे पिलांना जन्म देण्यास कारणीभूत असतात ती वाढतात, त्याचा फायदा आपल्याला एकाचेवळी जास्त पिलांच्या रूपाने मिळतो. गर्भधारणे मध्ये 5 व्या किंवा 6 व्या गर्भधारणे नंतर पिलांची सरासरी संख्या घटते अशा माद्यांना आपण मांसाकरीता विकू शकतो.

| | |
|---|---|
| माद्यांचे प्रजनन करण्याचे वय | 7-8 महिने |
| प्रजननावेळी वजन | 100-120 किलो |
| गर्मीचा कालावधी | 2-3 दिवस |
| गर्मीमध्ये प्रजननासाठी सर्वोत्तम वेळ | प्रथम प्रजनना साठी आलेली मादा पहिल्या दिवशी अन्य मादा - दुसऱ्या दिवशी |
| प्रति समागमांची संख्या | दोन समागम 12 ते 14 तासांच्या अंतराने |
| माजाचा कालावधी | 18-24 दिवस (सरासरी - 21 दिवस) |
| पिलांना वेगळे केल्यानंतर माजावर येणे | 2-10 दिवस |
| गर्भधारणेचा कालावधी | 114 दिवस |

डुकरांमध्ये माजाचा कालावधी ससासरी 19-21 दिवसांचा असतो. माजाचा कालावधी तीन ते पाच दिवस असतो . त्याची सुरुवात माद्यामध्ये बाहय जननें द्रियावर सुज येण्यापासून त्यातून एका प्रकारचा स्त्राव येण्यावरून दिसून येते. गर्मी वारंवार लघवी होणे, कमी भूक लागणे, समागमासाठी तत्पर असणे, कान उभे ठेवणे, पाठीवर दाब दिल्यास स्थिर राहणे ह्या सारखी लक्षणे दिसतात. प्रजननासाठी सर्वोत्तम वेळ मासिक पाळीच्या पहिल्या दिवशीच्या संध्याकाळी वा दुसऱ्या दिवशी सकाळी असते.